**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/तक्रार क्र. १५७८/०१.**

**श्री. अनिल गलगली,**
**जुना खारवाला चाळ, काजूपाडा,**
**साकिनाका, मुंबई ४०० ०७२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**उपाध्यक्ष, रिलायन्स एनर्जी लिमिटेड,**
**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,**
**रिलायन्स एनर्जी लिमिटेड,**
**सांताक्रुझ (पू) मुंबई ४०० ०५५.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - १४/०३/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**उपाध्यक्ष, रिलायन्स एनर्जी लिमिटेड - अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १५/१२/०८ रोजी जन माहिती अधिकारी, रिलायन्स एनर्जी, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, यांच्याकडे वीज देयक हस्तांतरण प्रक्रिया दि. ०१/०९/२००५ पासून तसेच (१) वीज देयक खाते क्रमांक.१०१२९५७२३ हस्तांतण केव्हा व कोणाचे नावाने करण्यात आले. (२) हस्तांतारण करताना खाते क्र. १०१२९५७२३ मध्ये क्रेडीट दाखविली गेलेली रक्कम नवीन खाते क्र.१५०१४४५३७ मध्ये हस्तांतरण न करण्याचे कारण काय आहे.(३) वीज देयक हस्तांतरित करताना सर्व कागदपत्रे जमा केल्यानंतर हस्तांतरण होत असताना क्रेडीट रक्कम हस्तांतरित न करण्याचे कारण काय आहे व दि. ०१/१२/२००८ रोजी श्री.अनिल गलगली यांनी केलेल्या अर्जावर कोणती कारवाई केली. (४) ज्याअर्थी क्रेडिट रक्कम पूर्वीच्या खात्यातून हस्तांतरित झाली नाही त्याअर्थी हस्तांतरण अजूनही पूर्ण झालेले नाही व ती अजूनही प्रक्रियेत आहे.(५) हस्तांतरण करताना वीजदेयक खाते बदलून नवीन खाते देण्यासंबधात वीज नियामक आयोगाने निश्चित धोरण ठरविले आहे अथवा वीज कायदाप्रमाणे तशी तरतूद आहे. अशी सर्व माहिती व्यक्तीशः मिळावी म्हणून मागितलेली दिसून येते.

२.	सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दि. २०/१२/२००८ रोजी उपाध्यक्ष रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अन्वये दि. ०७/०१/२००९ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. परंतु दि.०८/११/२०१० रोजी तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे तक्रारीसंदर्भात स्मरणपत्र दाखल केलेले आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.२२/१२/२०१०, दि २१/०१/२०११ रोजी सुनावणीच्या नोटीस काढण्यात आलेल्या आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०८/११/२०१० रोजीच्या स्मरणपत्राच्या सदंर्भामध्ये दि. २०/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस लेखी युक्तीवादात आयोगापुढे असे सांगितले की, मा. उपाध्यक्ष, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड मुंबई, किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तरी त्यांचे म्हणणे लेखी देत आहे, मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही ग्राहकांना वीज पुरवणारी कंपनी आहे व ग्राहक म्हणून उपनगरातील लाखो नागरिकांना सेवा पुरविते. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाद्वारे मेसर्स रिलायन्सला परवाना मिळाला आहे. ही कंपनी आवश्यक सेवा पुरविणारी असल्यामुळे नागरिकांच्या दृष्टिकोनातून ही कंपनी खाजगी कशी असू शकते? ज्याअर्थी परवाना घेऊन वीज पुरवित आहे त्याअर्थी आयोगाचे सर्व नियम लागू आहेत. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीची वेबसाइट पहाणी केली असता सर्व पब्लिक शेअर होल्डींग ५७.११% आहेत. ज्याअर्थी पब्लिक शेअर होल्डींग मधील अधिकांश संस्थाना माहिती अधिकार लागू होतो त्याअर्थी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीला सुध्दा हेच निकष लागू होतात. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टिने याबाबत व्यावहारिक स्तरावर आपण निर्णय घेतला तर उपनगरवासियांना आपल्या जोडणी क्रमांकापासून विविध तक्रारीसाठी माहिती अधिकाराचा वापर करता येईल.ही कंपनी सार्वजनिक प्रधिकरण म्हणून का संबोधण्यात येऊ नये? तर आपण योग्य तो निर्णय द्यावा असा विनंती अर्ज आयोगापुढे दिलेला आहे व सोबत सदर कंपनीच्या पब्लिक शेअर होल्डर्स संदर्भातील माहिती ही आयोगाकडे दाखल केलेली आहे.

३.	सदरच्या तक्रारीच्या संदर्भात तक्रारदाराने उपस्थित केलेला मुद्दा हा एखाद्या खाजगी कंपनीस 'माहितीचा अधिकार' लागू हातो किंवा नाही असा महत्त्वाचा असल्यामुळे सदरच्या तक्रारी संदर्भात माहिती आयोगाच्या तीन सदस्यांच्या खंडपीठापुढे सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक वाटल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी १. मुख्य माहिती आयुक्त २.राज्य माहिती आयुक्त, अमरावती ३. राज्य माहिती आयुक्त, नाशिक यांचे खंडपीठ घटीत करावे व तक्रारीची सुनावणी घ्यावी असे आदेश दिल्यामुळे दि. २५/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयुक्ताचे कार्यालयातून १४/०३/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे अशी नोटीस काढण्यात आलेली होती. त्याप्रमाणे दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे उपाध्यक्ष यांनी आयोगापुढे युक्तीवाद केला व त्यांनी दि. २१/०१/२०११ रोजी लेखी युक्तीवाद दिला होता तो आयोगाच्या निदर्शनास आणला. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे उपध्यक्ष यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी असून शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा सवलती या कंपनीस मिळत नाहीत त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून जी व्याख्या केलेली

आहे त्या व्याख्येमध्ये सदरच्या कंपनीचा समावेश होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार लागू होत नाही. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी १९२९ मध्ये कंपनी ॲक्ट १९१३ च्या तरतूदीप्रमाणे स्थापन झ ाली आहे व ती रिलायन्स ग्रुपचा भाग आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीचे वीज उत्पादन, वीज वितरण इ. व्यवसाय आहेत. तसेच रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी संविधानाप्रमाणे किंवा कोणत्याही संसदेच्या कायद्याप्रमाणे किंवा शासनाच्या आदेशाप्रमाणे घटीत झालेली कंपनी नाही किंवा शासन मालकीची सुध्दा नाही, तसेच शासनाचे नियंत्रण सुध्दा नाही किंवा या कंपनीस शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. त्यामुळे या कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

४. तक्रारदार यांनी पुन्हा युक्तीवाद करताना असे सांगितले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी मुंबई उपनगरामध्ये वीज नियामक आयोगाने दिलेल्या अनुज्ञपती प्रमाणे वीज वितरणाचे काम करते व वीज नियामक आयोग हे इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या तरतूदी प्रमाणे स्थापन झालेले आहे व इलेक्ट्रीसिटी ॲक्ट हा संसदेचा कायदा आहे. वीज वितरणाचे काम हे एक सार्वजनिक सेवा असल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होणे आवश्यक आहेत. जेणेकरुन रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनी कडून वीज ग्राहकांवर जो अन्याय होतो त्याकरिता त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे, तरी सदरच्या अधिनियमाच्या तरतूदी लागू होतात असे तक्रारदार यांनी पुन्हा प्रतिपादन केल्यामुळे ज्या वीज नियामक आयोगाने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस अनुज्ञप्ती दिलेली आहे त्या वीज नियामक आयोगाचे अभिप्राय मागणे खंडपीठास आवश्यक वाटल्यामुळे दि. २१/०४/२०११ रोजी अधिनियमाचे कलम १८ (३) चे अधिकाराचा वापर करुन अंतरिम आदेश पारित करुन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे अभिप्राय मागविले .महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे अवर सचिव यांनी वीज नियामक आयोगाचे अभिप्राय आयोगापुढे सादर केलेले आहेत. त्यामध्ये इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे वीज वितरण इ. संदर्भात असलेल्या अधिनियमांप्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला कलम १४ प्रमाणे मुंबई उपनगरासाठी वीज वितरणाकरिता अनुज्ञप्ती दिलेली आहे. तसेच वितरण म्हणजे सदरच्या परिसराला वीजपुरवठा करणे व ही सार्वजनिक सेवा आहे असे अभिप्राय दिलेले आहेत, असे म्हटलेले आहे.

५. तक्रारदार, गैरतक्रारदार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी व महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांचे युक्तीवाद व अभिप्राय विचारात घेऊन खालीलप्रमाणे मुद्दा हा विचारात घेण्यात येतो.
" इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे स्थापन झालेल्या विज नियामक आयोगाने अधिनियमाच्या कलम १४ प्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीस विज वितरणाचे हक्क अनुज्ञप्तीने ( Licence) दिलेले असल्याने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस विज वितरणाचे हक्काचे मर्यादेपर्यंत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात काय? "

६. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी असल्यामुळे व शासनाची मालकी किंवा नियंत्रण नसल्यामुळे किंवा शासनाच्या आदेशाप्रमाणे स्थापन झालेली नसल्यामुळे तसेच शासनकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्यामुळे, माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या

तरतूदी या कंपनीस लागू होत नाही, असे जे म्हटले आहे त्यानुसार माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २ (ज) मध्ये 'सार्वजनिक प्रधिकरण' या

संज्ञेच्या व्याखेमध्ये समावेश होतो किंवा नाही ही बाब तपासणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २ (ज) मध्ये 'सार्वजनिक प्रधिकरण' याचा अर्थ,

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये ;

(रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही संविधानाद्वारे स्थापन झालेली नाही.)

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;

(संसदेने इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ हा पारित केलेला आहे.)

या कायद्याच्या तरतूदीप्रमाणे राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग स्थापन केलेले आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगास संसदेच्या अधिनियमाप्रमाणे वीज निर्मिती, वीज वितरण वीज पारेषण इ. संदर्भामध्ये नियंत्रण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम १४ प्रमाणे वीज वितरणाकरिता एखाद्या खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीला अनुज्ञप्ती देऊन वीज वितरणाचे हक्क देण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस मुंबई उपनगर या परिसरासाठी वीज वितरणाचे अधिकार देण्यात आलेले आहेत.)

(ग) राज्य विधी मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाची स्थापना नाही.)

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित

करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यामध्ये;

**(एक)** समुचित शासनाची मागणी असलेली, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणत वित्त पुरवठा केला जातो असे निकाय;

**(दोन)** समुचित शासनाकडून निधीद्वारे तिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशी अशासकिंय संघटना , यांचा समावेश होतो ;

प्रत्यक्ष समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला हक्क देण्यात आलेले नसले तरी शासनाने स्थापन केलेल्या आयोगाने वीज वितरणाचे हक्क दिलेले आहेत.

७. वरील व्याख्येप्रमाणे संसदेने पारित केलेल्या इलेक्ट्रिक ॲक्ट २००३ च्या तरतूदीप्रमाणे 'समुचित शासनाने' 'महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग' स्थापन केला असुन व त्या वीज नियामक आयोगाने विशिष्ट परिसरात वीज वितरणाचे हक्क एखाद्या कंपनीला दिले असल्यास वीज वितरणाचे हक्क हे अप्रत्यक्षपणे शासनानेच एखाद्या कंपनीला दिले आहेत असा त्याचा अर्थ घेणे आवश्यक आहे. वीज वितरण ही सार्वजनिक सेवा आहे व वीज वितरणाशी सेवा क्षेत्र म्हणून थेट ग्राहकांचा संबध येतो. महाराष्ट्रामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका वीज वितरणाचे अधिकार हे बेस्ट या महानगरपालिकेच्या

उपक्रमाचे आहेत. महानगरपालिका हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. पर्यायाने बेस्ट या उपक्रमास सुध्दा लागू होतो. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहक हे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार बेस्ट उपक्रम वीज वितरण संदर्भात माहिती मागू शकतात. उर्वरित महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र राज्य वीजवितरण कंपनीकडे वितरणाचे हक्क आहेत. परंतु, त्या कंपनीचे संपूर्ण नियंत्रण हे शासनाकडे आहे व तो शासनाचा उपक्रम आहे. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रमध्ये वीज वितरणाचे हक्क हे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे दिलेले असल्यामुळे त्या कंपनीस सुध्दा शासकिय उपक्रम म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात व त्या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहक हे वीज वितरण संदर्भामध्ये माहिती मागू शकतात. यावरुन विज वितरण हे सार्वजनिक सेवा क्षेत्रात येत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका व उर्वरित महाराष्ट्रतील वीज ग्राहकांना वीज वितरण संदर्भामध्ये माहितीचा अधिकार हा वापरता येतो. परंतु केवळ रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी आहे व ती शासनाने स्थापन केलेली नाही किंवा शासनाची मालकी किंवा शासनाच्या नियंत्रणात येत नाही. या कारणास्तव त्या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहकांना त्यांच्या अत्यावश्यक सार्वजनिक सेवे संदर्भामध्ये माहितीच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हे त्यांच्यावर अन्यायासारखे आहे व ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रस्ताविकेत दिलेल्या उद्देशाशी विसंगत होईल. अधिनियमातील प्रस्ताविकेमध्ये;

"आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितीगार नागरी समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ति च्या कार्यशीलतेच्या दृष्टिने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यासाठी उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टिने अत्यावश्यक आहेत;............
त्या अर्थी, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविध माहिती पुरविण्याकरिता तरतूदी करणे इष्ट आहे."

८. वरील उद्देशाप्रमाणे मुंबई उपनगर जिल्हा या कार्यक्षेत्रात रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीला वीज वितरणाचे हक्क सेवा क्षेत्र म्हणून दिलेले असल्याने त्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना सुध्दा ती सार्वजनिक सेवा क्षेत्र म्हणून कार्यरत असल्यामुळे माहिती मिळविण्याचा हक्क आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सार्वजनिक क्षेत्रातील माहिती मिळण्याचा नागरिकांच्या हक्कासाठी पारित झालेला असल्याने अधिनियमाच्या तरतुदींचा काटेकोरपणे अर्थ न घेता प्रास्ताविका, व इतर सर्व तरतुदींचे एकत्रित वाचन करुनच नागरिकांच्या दृष्टीने फायदेशीर अर्थ लावणेसाठी स्थूलमानाने निर्णय करणे आवश्यक आहे. अन्यथा काही क्षेत्रातील नागरिकांना एखाद्या सेवा क्षेत्रातील माहिती मिळविण्याचे करीता वंचित ठेवणे हे भेदभाव करण्यासारखे होईल. तसेच "सेवा क्षेत्र" , सार्वजनिक सेवा याबद्दल मा. न्यायालयाचे निर्णय अवलोकन करणे संयुक्तीक राहील.

According to Encyclopaedic Law Lexican 21st Century Unabridged Edition by Justice C.K. Thakker, Ashoka Law House New Delhi (India) " Public utilities:- A publicity or privatelu owned company that sells electricity, natural gas, telephone service, water, other utilities. Most utilities operate as monopolies in their respective geographical areas."

"Public Utility Undertaking- There is no statutory definition of "Public Utility" in the context of Indian Enactment that may be relevant for

our present purpose. There is a definition of "Public Utility Service" in Section 2(n) of the Industrial Disputes Act, 1947, which inter alia, covers " any industry which supplies power, light or water to the public and certain notified industries. (AIR 1990 SC 1851) व त्यामुळेच समुचित शासनाने जरी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग स्थापन केलेला असला तरी त्याच आयोगाने अधिनियमांच्या तरतूदीप्रमाणे वीज वितरणाचे हक्क सेवा क्षेत्र म्हणून त्या कंपनीस दिलेले असल्यामुळे अप्रत्यक्षपणे ती शासनाचीच सेवा ठरते असा निकर्ष काढावयास हरकत नाही.

The term "licence" is usable in three possible sense. In its most natural sense,
"licence" is an authority justifying the doing what otherwise would be worngful. It is in the nature of a grant of permission to exercise certain privilege, or carry on a particular business, to pursue a certain occupation etc. A licence may be two kinds, namely, a bare licence which is purely a matter of personal privilege and a licence coupled with a grant or interest. If a licence is coupled with a grant or interest than the grantor cannot in general revoked it so as to defeat the grant to which it is incident. In order to grant licence a man need not be its owner. (AIR 1998 Bom 107)

९. एखाद्याने स्वतःचे अधिकार हे दुसऱ्या व्यक्तीला प्रदान केले असले तरी मूळ अधिकार प्रदान करणाऱ्याकडेच असतात, असे कायद्याचे तत्व आहे.

"Deligation does not imply a parting with power by the person who grants the deligation but points rather to conferring of an authority to do certain things which otherwise the person would have to do himself." (AIR 1963 MP 74)

१०. तसेही वीज वितरण ही सेवा सार्वजनिक असल्यामुळे इलेक्ट्रिक ॲक्ट २००३ च्या कलम १५ प्रमाणे एखाद्या कंपनीस वीज वितरणाचे हक्क द्यावयाचे असल्यास, त्या कंपनीस ग्राहकांचे अभिप्राय व हरकती मागविण्यासाठी वर्तमापत्रामध्ये नोटीस प्रसिध्द करावी लागते व अशी नाटीस प्रसिध्द करुन त्या क्षेत्रातील वीज ग्राहकांनी जे अभिप्राय किंवा हरकती घेतल्या असतील, त्या वीज नियामक आयोगाने विचारात घेऊन मगच त्या कंपनीला अनुज्ञप्ती द्यावयाची की नाही असा निर्णय घ्यावयाचा असतो. याचा अर्थ अधिनियमात सुध्दा ग्राहकांच्या हितास महत्त्व देण्यात आलेले आहे. इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ चे कलम १०८ प्रमाणे ;

" शासनाला महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सार्वजनिक हिताच्या धोरणांच्या संदर्भात निर्देश देण्याचे अधिकार आहेत आणि त्याबाबतीत शासनाचे अधिकार हे अंतिम आहेत. "

११. यावरुन राज्यातील वीज निर्मिती, वीज नियंत्रण,वीज वितरण किंवा वीज व्यापार यासंदर्भात राज्य शासनाचेच नियंत्रण असल्यामुळे त्या संदर्भात वीज वितरण करणाऱ्या कोणत्याही कंपनीवर नियंत्रण आहे, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी

(रिलायन्स एनर्जी) चा इतर व्यवसाय वगळून वीज वितरणाच्या क्षेत्रामध्ये तिचा 'सार्वजनिक प्रधिकरण' या व्याख्येत समावेश होतो व त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी वीज वितरणाच्या कार्यक्षेत्रापुरती लागू होतात.

१२. तसेही, इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे वीज वितरण हे वीज ग्राहकांशी थेट संबधित असल्यामुळे व ती सार्वजनिक सेवा असल्यामुळे Maharashtra Electricity Regulatory Constitution (Consumer Grievances Registered Forum and Electricity Amusement) Regulation चे माध्यमातून वीज ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्याचे विनियम करण्यात आलेले आहेत व त्याचे कारण ही वीज ग्राहकांचे हितसंबध सुरक्षित राखण्याचा उद्देश दिसून येतो. यावरुन वीज वितरण ही सार्वजनिक सेवा क्षेत्रात येत असल्यामुळे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या वीज विरतणाच्या हक्काच्या अनुज्ञप्ती संदर्भात वीज वितरणच्या कार्यक्षेत्रामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात.

१३. तक्रारदार यांनी मात्र जी माहिती त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली आहे, त्या माहितीचा विचार केल्यास सर्वसाधारणपणे वीज देयक खाते क्रमांकासंदर्भात माहिती मागण्यापेक्षा ती तक्रार दिसून येते व त्या संदर्भामध्ये 'वीज लोकपाल' यांचेकडे तक्रार करुन त्यांना तक्रारीचे निवारण करुन घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) व (ञ) प्रमाणे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केली आहे व त्या व्याख्येप्रमाणे माहिती ही 'सार्वजनिक प्रधिकरणात' साहित्याच्या स्वरुपात म्हणजेच कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके इ. स्वरुपात उपलब्ध असल्यामुळे दस्तऐवजांची किंवा कागदपत्रांची तपासणी करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असे आहे. या दोन्हीही व्याख्येत तक्रारीचे निवारण करण्याची तरतूद नाही किंवा तसे अधिकार राज्य माहिती आयोगाकडे दिलेले नाहीत.

१४. असे असले तरी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या वीज वितरणाच्या हक्काच्या मर्यादेपर्यंत 'सार्वजनिक प्रधिकरण' व्याख्येत समावेश होत असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात असा निष्कर्ष येत असल्याने या कंपनीने अनुज्ञप्तीच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिनियमाचे कलम ५(१) व १९ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करुन ती सर्वसाधारण नारिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश---**

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीला संसदेच्या कायद्यान्वये महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या वीज नियामक आयोगाने वीज वितरणाचे हक्क अनुज्ञप्तीने देण्यात आलेले असल्याने त्या विज वितरणाचे कार्यक्षेत्रासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१) प्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी व कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

२. तक्रारदार यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

दिनांकः / /२०११
मुंबई.

| | | |
|---|---|---|
| श्री. विलास पाटील<br>राज्य मुख्य<br>माहिती आयुक्त | श्री. भास्कर पाटील<br>राज्य माहिती<br>आयुक्त, अमरावती | श्री. मा. ही. शहा<br>राज्य माहिती<br>आयुक्त, नाशिक |

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील

क्र.२००८/रामाआ/अपील/सिआर/२७८५

डॉ.(श्रीमती) अर्चना एस.गावडा, .....अपीलकर्ता
प्लॅट क्र.३०१, ब्लॉक बी-३०, कर्ता पुरख अपार्टमेंट,
प्रभात गार्डनच्या मागे, उल्हासनगर - ४२१ ००५.

३.२ प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव .....उत्तरवादी
मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३.३ प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव .....उत्तरवादी
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३.४ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव .....उत्तरवादी
मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३.५ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव .....उत्तरवादी
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१. अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८५
२. सुनावणीचा दिनांक : २६.११.२०१०
३. आज रोजीची उपस्थिती
३.१ अपीलार्थी -डॉ.(श्रीमती) अर्चना एस.गावडा
३.२ प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव
मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३.३ प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३.४ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३.५ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| ४. जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | : | दि.२१.०४.२००७ |
| ५. जन माहिती अधिका-यांने उत्तर दिल्याची तारीख | : | दि.०७.०५.२००७,<br>दि.१५.०५.२००७ |
| ६. प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | : | दि.२८.०५.२००७ व<br>दि.२७.०६.२००७ |
| ७. अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | : | दि.०४.०६.२००७ |

दि.१८.०७.२००७

८. राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख : दि.२९.०७.२००७

## निर्णय

अपीलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचे खंडपीठासमोर सुनावणीस आले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, अपीलार्थीचे वकील श्री.एस.के.गावडा, दोन्ही जन माहिती अधिकारी तसेच दोन्ही प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित आहेत.

२. अपीलार्थीचा युक्तीवाद

२.१ अपीलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ दि.२१.०४.२००७ च्या माहिती अधिकार अधिनियमाच्या अर्जान्वये ULCR Act शी संबंधित माहिती मिळण्याबाबतची भूमिका कायम ठेवली आहे. त्यांना हवी असलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रत.

२. मंत्रीमंडळाने ज्याच्या आधारे निर्णय घेतला त्या माहिती सामुग्रीची प्रत,

३. निर्णय घेण्याच्या कारणांची प्रत.

२.२ अपीलार्थी यांच्या वकिलाने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांच्या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी (क्रमांक १) यांनी त्यांच्या दि.०७.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती गोपनीय आहे या कारणास्तव माहिती देण्याचे नाकारले आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.०४.०७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असा निर्णय देउन माहिती देण्याचे नाकारले. ही माहिती नाकारताना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१) (i) चा आधार घेतला आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी (क्रमांक २) यांनी दि.२७.०६.२००७ तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी (क्रमांक २) यांनी दि.१८.०७.२००७ रोजी माहिती देण्याचे नाकारले आहे.

२.३ अपीलार्थी यांच्या वकिलाने ULCR Act च्या संबंधात मंत्रीमंडळाने जे निर्णय घेतले आहेत त्याबाबतची माहिती त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१) (झ) अन्वये अनुज्ञेय होत आहे अशी भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते ही माहिती या परंतुकामुळे आता देय होत आहे, कारण हे प्रकरण आता पुर्ण झाले आहे.

३. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचा युक्तिवाद

३.१ प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे अशी भूमिका घेउन अपीलार्थी यांनी मागितलेली मंत्रीमंडळासंबंधातील कागदपत्रे देता येणार नाहीत असा निर्णय देताना मंत्रीमंडळाच्या कामकाजाबाबत भारतीय राज्य घटनेच्या तरतूदी व त्याअन्वये नियमित करण्यात आलेल्या शासकीय कार्यनिमावलीतील नियमांचा अधार घेतला आहे व त्याचा उहापोह प्रथम अपिलामध्ये केलेला आहे व तो खाली उध्दृत केला आहे.

"अधिनिमाच्या कलम ८ व ९ अन्वये कोणकोणती माहिती देणे आवश्यक नाही याबाबत स्पष्ट तरतूद केलेली आहे. अधिनियमाच्या कलम ८(१) (i) नुसार मंत्रिमंडळाशी सबंधित कागदपत्रे (Cabinet Papers) देणे आवश्यक नाही अशी स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. मंत्रिमंडळासमोर

सादर होणारे विषय व त्यामध्ये होणारी चर्चा आणि त्या अनुषंगाने होणारे इतिवृत्त या बाबींना अधिनियमात संरक्षण देण्यात आलेले आहे. मात्र मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जेव्हा संरक्षण विभागाकडून आदेश काढण्यात येतात ते आदेश व त्यावरील कारणमिमांसा संबंधित आदेशात नमूद करुन, ज्याला सर्वसाधारण शासकीय कार्यप्रणालीत शासन (Government Resolution) असे संबोधले जाते, ते मात्र जनतेसाठी उपलब्ध होउ शकतात अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ८(१) (i) च्या परंतुकामध्ये स्पष्ट आहे."

"ही तरतूद या अधिनियमात भारतीय घटनेत नमूद असलेलया विशिष्ट तरतूदीच्या आधारे करण्यात आलेली आहे हे स्पष्ट आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ मध्ये शासनाचा कार्यव्यवहार कोणत्या पध्दतीने चालविला जाईल याबाबत तरतूद केली असून त्या कलमाच्या १६६ (३) अन्वये मा.राज्यपालांना शासन कार्यनियमावली करण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे जी शासन कार्यनियमावली तयार करण्यात आलेली आहे, त्यामध्ये भार २(सर्वसाधारण) मधील सुचना क्र.३० अन्वये सुध्दा मंत्रिमंडळाचे कागदपत्रे गुप्त स्वरुपाची असतील असे स्पष्ट आहे. ही सुचना भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ अन्वये असल्याने, या घटनादत्त तरतूदीच्या आधारे सुध्दा मंत्रिमंडळाची कागदपत्रे देणे बंधनकारक नाही, नव्हे ते घटनेतील तरतूदीच्या विरुध्द होईल."

"भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४(३) अन्वये प्रत्येक मंत्र्यांना गोपनीयतेची शपथ घेणे आवश्यक आहे. या गोपनीयतेच्या शपथेचा मसुदा भारतीय राज्य घटनेच्या श्येडयुल ३(vi) मध्ये दिला असून मा.मंत्री यांच्या समोर असलेली कोणतीही माहिती ते मंत्री म्हणून धारण केलेली जबाबदारी पार पाडण्याखरेजी उघड करणार नाही अशी तरतूद आहे. प्रत्येक मंत्र्यांवर जे बंधन आहे ते साहजिकच मंत्रिमंडळाच्या होणा-या सामूहिक चर्चेबाबत व मंत्रिमंडळासमोर येणा-या माहितीबाबत सुध्दा लागू आहे. त्यामुळे भारतीय राज्य घटना व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ८(१) या दोघांची सांगड घालता मंत्रिमंडळाच्या कामकाजाविषयक कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे उघड करणे कायद्याने व भारतीय राज्य घटनेनुसार बेकायदेशीर ठरेल. त्यामुळे शासकीय माहिती अधिकारी, मुख्य सचिव कार्यालय यांनी अपिलकारांना मंत्रिमंडळ बैठकीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करण्याची जी विनंती नाकारली आहे ती कायदेशीर तरतुदीनुसार सुसंगत आहे."

४. <u>आयोगापुढील विचारार्थ मुद्दे</u>

४.१ आज दि.२६.११.२०१० रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला व प्रकरण निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रे पहाण्यात आली. या सर्वांचा समग्र विचार करुन या प्रकरणात आयोगाने खालील मुद्यांवर विार करणे आवश्यक ठरत आहे.

४.१.१ माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (झ) मध्ये नमूद केलेली मंत्रिमंडळाची कागदपत्रे, विचारविमर्श अभिलेख, मंत्रिमंडळाचे निर्णय त्याची कारणे, ज्या आधारावर निर्णय घेण्यात आला आहे तो आल्याची सामग्री व इतर निर्माण होणारी कागदपत्रे इत्यादी विविध सामग्री.

४.१.२ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ (१) (झ) मधील तरतुदी व तरतुदीमधील दोन परंतुका यांचा अशा सर्व कागदपत्रावरील प्रभाव.

४.१.३ भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ (३) अन्वये निर्माण केलेल्या कायदा नियमावली व त्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीशी सुसंगती.

४.१.४ भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४ (३) मधील तरतुदी आणि माहितीचा अधिकार अधिनियम व त्यांची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगती.

४.१.५ ULCR Act शी संबंधित मागणी केलेल्या कागदपत्राबाबतचे प्रकरण पूर्ण झाले आहे किंवा समाप्त झाले का ही बाब.

५. मुख्य माहिती आयुक्त श्री.विलास पाटील, राज्य माहिती आयुक्त, अमरावती श्री.भास्कर पाटील, राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद श्री.दि.बा.देशपांडे, राज्य माहिती आयुक्त, नागपूर श्री.पी.डब्ल्यू.पाटील यांचे अभिप्राय व निष्कर्ष

५.१ मंत्रिमंडळापुढे एखादे प्रकरण जेव्हा निर्णयाकरिता सादर करण्यात येते तेव्हा याबाबतची एक समग्री टिपणी ज्यास मंत्रिमंडळ टिपणी (कॅबिनेट नोट) म्हणून संबोधण्यात येते आणि ती गुप्त स्वरुपाची असते ती तयार करण्यात येते व ही टिपणी सर्व मंत्रीमहोदयांना मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी पुरविण्यात येते. त्याच्या प्रती मर्यादित असतात व टिपणी "गुप्त" राखण्यात येते. ही टिपणी तयार करण्यापूर्वी त्या विषयावरील प्रस्ताव एखादे वेळेस मंत्रालय स्तरावर तयार करण्यात येईल किंवा क्षेत्रीय प्रमुखाकडून मंत्रालयास सादर करण्यात येईल. त्यावर एक नस्ती मंत्रालयात तयार होते व ती नस्ती कक्ष अधिकार यांचेकडून विविध अधिका-यापासून सचिव/प्रधान सचिव तसेच जिथे वित्तीय भार असेल तेथे नियोजन व वित्त विभागाकडे सल्लामसलतीकडे पाठविण्यात येते. आवश्यक तेथे विधी व न्याय विभागाचाही सल्ला घेण्यात येतो. या नस्तीमध्ये दोन भाग असतात ते म्हणजे NS (noting section) व CS (correspondence section) या नस्तीवर एका भागात (NS) विविध सचिवांनी तसेच विविध विभागाच्या विविध अधिका-यांनी दिलेली त्यांची मते असतात व दुस-या भागात (CS) पत्रव्यवहार, statistical data किंवा क्षेत्रीय अधिका-यांच्या केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, प्रकल्प अहवाल इत्यादी असतात. ही प्रक्रिया पूर्णत्वाला आल्यावर मंत्रिमंडळा-पुढे सादर करण्याकरिता एक समग्र टिपणी तयार करण्यात येते. त्यास "मंत्रीमंडळाची टिपणी" (Cabinet Note) संबोधण्यात येते. त्यामध्ये प्रस्ताव करणा-या विभागाचे अभिप्राय, प्रस्तावाची आवश्यकता, प्रस्तावाबाबत सर्वकष उहापोह तसेच वित्त विभागाचे अभिप्राय, नियोजन विभागाचे अभिप्राय व विधी आणि न्याय विभागाच्या शिफारशी जेथे आवश्यक असतील तेथे त्या नमूद केलेल्या असतात व अशी टिपणी मंत्रिमंडळापुढे विचारार्थ ठेवण्यात येते. त्याच्या आधारावर मंत्रिमंडळात विचारविनिमय होउन निर्णय घेण्यात येतो. मंत्रिमंडळासमोर मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये संबंधित नस्ती सादर करण्यात येत नाही. अशा प्रकारे मंत्रिमंडळाकरीता बैठकीमध्ये निर्णय घेण्याअगोदर संपूर्ण प्रक्रिया होते व ज्यामध्ये मोठया प्रमाणात कागदपत्रांची निर्मिती होते. तथापि मंत्रिमंडळासमोर विचारार्थ "मंत्रीमंडळ टिपणी"च (Cabinet Note) ठेवण्यात येते व त्याच्या आधारावर मंत्रीमंडळ निर्णय घेतो.

५.२ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (झ) चे अवलोकन केले असता वर नमूद केल्याप्रमाणे मंत्रिमंडळासंदर्भात ज्या कागदपत्रांची निर्मिती होते व सरतेशेवटी मंत्रिमंडळासमोर त्यांना निर्णय घेण्याकरिता जी कागदपत्रे सादर होतात म्हणजे मंत्रीमंडळ टिप्पणी हे पाहिले असता कलम ८(१) (झ) च्या कलमामध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे ते प्रकरण पूर्ण झ-

ाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करण्याचे अभिप्रेत असते तर कलम ८(१) (झ) मधील परंतुकाची तजवीज करताना विशिष्ट कागदपत्रांचा उल्लेख करण्यात आला नसता व प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर ही सर्व कागदपत्रे उघड करावी येवढीच तरतूद करण्यात आली असती. यावरुन स्पष्ट होते की, मंत्रिमंडळाकरिता निर्माण होणा-या बहुविध कागदपत्रांमधून प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर यापैकी फक्त मंत्रीमंडळ / परिषदेचे निर्णय व कारणे (शासननिर्णय) आणि ज्या आधारावर निर्णय घेण्यात आला आहे ती सामग्री जाहीर करावयाची आहे म्हणजे मंत्रीमंडळाची टिप्पणी (Cabinet Note) मंत्रिमंडळाचा निर्णय व निर्णयाची कारणे ही शासनाच्या निर्णयामध्येम (GR) नमूद केलेली असतात. या सर्व बाबींचा साकल्याने विचार केल्यावर असे स्पष्ट होते की, कलम ८(१) (झ) मधील तरतूद व प्रथम परंतुका यांच्या आधारावर अपीलार्थीने मागितलेली माहिती देय होत नाही. परंतु उर्वरीत माहिती जसे संबंधित नस्ती, मंत्रीमंडळ / परिषदमधी व सचिव व इतर अधिकारी यांच्या चिचारविमर्साचे अभिलेखे देय होणार नाहीत. तथापि येथे असे ही नमूद करावेस वाटते की, कलम ८(१) (झ) मधील दुसरी परंतुका विचार घेता प्रत्येक मंत्रीमंडळाच्या प्रस्तावाच्या संदर्भात स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक ठरते व असा निर्णय प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेवर व परिस्थितीवर अवलंबून घ्यावा लागेल.

५.३ भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ मधील शासनाचा कार्यव्यवहार कोणत्या पध्दतीने चालविला जाईल याची तरतूद असून कलम १६६ (३) अन्वये राज्यपालांना कार्य नियमावली करण्याचे अधिकार आहेत. त्यामध्ये मंत्रिमंडळाची कागदपत्रे गुप्त स्वरुपाची असतील असे स्पष्ट आहे. तथापि हे गुप्त स्वरुप मंत्रीमंडळ निर्णय घेईपर्यंत आहे. तसेच प्रकरण पूर्ण होईपर्यंत आहे आणि त्यानंतर त्यांची गुप्तता राहत नाही व ठेवण्याची आवश्यकता नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेले निर्णय बहुतांशी जाहीर करण्यात येतात व तद्नंतर क्षेत्रामध्ये अंमलात येतात. त्यामुळे त्यात गोपनियता राहण्याचा प्रश्न येत नाही. अत: घटनेतील या तरतुदीशी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१) (झ) सुसंगत आहे असे दिसून येते.

५.४ त्याचप्रमाणे भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४ मध्ये प्रत्येक मंत्र्याला गोपनियतेची शपथ घेणे आवश्यक असते. ही बाब जरी खरी असली तरी एकदा मंत्रिमंडळाचा निर्णय झाला की हे बंधन लागू होणार नाही. यास्तव कलम ८(१) (झ) मधील तरतूदी सुध्दा येथे सुसंगत ठरत आहेत.

५.५ अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रस्तावनेकडे दृष्टीक्षेप टाकला असता राज्यकारभारात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करणे, संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखते व माहिती देण्यासाठी व्यवहार्य शासनपध्दती अवलंबणे इत्यादी महत्त्वाची उद्दिष्टे पाहता कलम ८(१) (झ) मधील तरतूद व परंतुकाची परीपूर्ण आहे व उद्दिष्टे साध्य करणारी आहे असे आढळून येईल.

५.६ सदरचे विचाराधीन प्रकरण पूर्ण झाले असून याबाबत शासन निर्णय ही निर्गमीत करण्यात आला आहे.

५.७ श्री.नवीन कुमार, राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ कोकण विभाग यांचे अभिप्राय: -

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थी यांची विनंती खालील बाबींमुळे नाकारलेली आहे: -

अ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (झ) नुसार मंत्रिमंडळाशी संबंधित असलेली कागदपत्रे देणे आवश्यक नाही. केवळ प्रकरण पुर्णत: संपल्यावर निर्णय व निर्णयाशी सलग्न सामुग्री देण्यासंबंधी तरतुद आहे.

ब) भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ अन्वये शासन कार्य नियमावलीत (भाग-२ सर्वसाधारण) मधील सूचना क्रमांक ३० नुसार मंत्रिमंडळाची कागदपत्रे गोपनीय स्वरुपाची असतील असे स्पष्ट केले आहे.

क) भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४ (३) अन्वये प्रत्येक मंत्र्यांना गोपनीयेतीची शपथ घेणे आवश्यक आहे व ती मंत्रिमंडळाच्या होणा-या सामुहीक चर्चेबाबत व मंत्रिमंडळाच्या समोर येणा-या माहितीस लागु आहे.

मी मागील परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या मुद्यांशी सर्वसाधारणपणे सहमत आहे.

मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त, डॉ.सुरेश जोशी यांनी दि.१८.०४.२००६ रोजी, अपील क्रमांक २००६/८३/०२ मध्ये दिलेल्या निर्णयामध्ये सुध्दा या मुद्यांना योग्य ठरविलेले आहे. (निर्णयाची प्रत संलग्न आहे.)

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम रद्द करण्यासबंधी मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती मागितलेली आहे. येथे असे नमूद करावे लागेल की, वैधानिक बाबींवर अंतिम निर्णय विधी मंडळात होतात, मंत्रिमंडळात नव्हे, नागरी कमाल जमीन धारणा अधिनियमावर विधी मंडळाचा निर्णय माहे नोव्हेंबर, २००७ च्या सुमारास झाला. त्यापूर्वी कलम ८(१) (झ) च्या परंतुका लागु होउ शकत नाही. शिवाय, हे ही ध्यानात ठेवावे लागेल की, वैधानिक बाबीवर मंत्रिमंडळात प्रामुख्याने वैधानिक मुद्दे विधी मंडळात कसे हाताळावयाचे याबद्दलची चर्चा व निर्णय होत असतात, अंतिम निर्णय होत नाही. अत: त्यासंबधीची चर्चा / निर्णय इत्यादी विधी मंडळाच्या निर्णयापूर्वी जाहीर करणे माहितीचा अधिकार कायद्याचे कलम ८ (१) (ग) नुसार सुध्दा योग्य होणार नाही. अत: प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयात कुठल्याही प्रकारचे बदल करणे आवश्यक वाटन नाही.

५.८ श्री.एम्.एच्.शहा, राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक विभाग यांचे अभिप्राय:-

अधिनियमाच्या कलम ८ (१) (झ) नुसार मंत्रिमंडळाची कागदपत्रे तसेच मंत्री परिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शांचे अभिलेख देणे आवश्यक नाही अशी तरतूद केलेली आहे. या पोट कलमामध्ये २ परंतुके आहेत. पहिल्या परंतुकानुसार मंत्री परिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री ही, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झ ााल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहिर करण्यात येईल. म्ळणजे मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर त्याची कारणामिमांसा संबंधित आदेशात नमूद करून ज्याला सर्वसाधारण शासकीय कार्यप्रणालीत शासन निर्णय (Government Resolution) असे संबोधले जाते ते जनतेसाठी उपलब्ध होउ शकतील अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ८ (झ) च्या या परंतुकामध्ये दिसून येते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अधिनियमातील कलम ८ (१) (झ) चे परंतुकास मर्यादित अर्थ आहे हे परंतुक एक प्रकारचे स्पष्टीकरण आहे. हे परंतुक मूळ क्लॉज (झ) ला निष्प्रभावित करीत नाही. कोणतेही परंतुक हे ते ज्या कलमाख्राली असते त्या मूळ कलमातील तरतूदी निष्प्रभावित / निरर्थक होत नाहीत. हा युक्तिवाद पटण्यासारखा आहे. मंत्रिमंडळाची कागदपत्रे (Cabinet Papers) यांचा उल्लेख (झ) मध्ये आहे, ती निर्णय झाल्यानंतर द्यावीत असे स्पष्टपणे परंतुकामध्ये म्हटलेले नसून मंत्री परिषदेचा

निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले आहेत ती सामग्री जाहिर करण्याबाबतचा उल्लेख आहे. मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर या परंतुकानुसार उघड करणे अपेक्षित असलेली माहिती ही सामान्यत: कोणत्याही शासन निर्णयात किंवा अधिसूचनेत समाविष्ट असते.

या ठिकाणी Cabinet papers मध्ये काय समाविष्ट होते आणि ज्या आधारावर निर्णय घेण्यात आला त्या सामग्रीमध्ये काय समाविष्ट होते याबाबत विचार करणे मला गरजेचे वाटते. Cabinet papers मध्ये cabinet note, त्यावरील विविध खात्यांचे अभिप्राय, त्या अभिप्रायाला मूळ खात्यांनी दिलेली उत्तरे यांचा समावेश होतो अशी धारणा आहे व या संबंधातील मूळ नस्तीमधील कार्यालयीन टिपण्या यांचाही या cabinet papers शी संबंध पोहचू शकतो. त्यामुळे ८(१) (झ) मधील तरतूदींनुसारही मंत्रिमंडळाची कागदपत्रे उघड करता येणार नाहीत. परंतु निर्णय झाल्यानंतर आणि प्रकरण पूर्ण झाल्यावर जी सामग्री जाहिर करावयाची आहे त्याबाबतचे माझे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत - कोणत्याही शासन निर्णयात किंवा अधिसूचनेत ज्या आधारावर निर्णय घेण्यात आला ते स्पष्ट केलेले असतेच. तसेच एखादी दुरुस्ती किंवा नवीन कायदा करण्याबाबतचा निर्णय असेल तर त्याचे हेतुवाक्य आणि उद्दिष्ट व करणांच्या टिपणीमध्ये ही माहिती समाविष्ट असते. त्यामुळे जी सामग्री जाहिर करावयाची आहे, त्याचा बहुतांश समावेश हा शासन निर्णयात किंवा कायद्यामध्ये असतोच. तथापि मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे जे इतिवृत्त असते त्याच्या आधारावर संबंधित खाते / विभाग शासन निर्णय बनवित असतात. त्यामुळे सामग्रीमध्ये मंत्रिमंडळाच्या इतिवृत्ताचा समावेश होतो अशी धारणा आहे. तसेच संबंधित विभाग हा शासन निर्णयाचा मसूदा तयार करतांना cabinet note मध्ये जे मुद्दे असतात व ज्याच्या आधारावर अंतिम निर्णय झालेला असतो त्याचाही उल्लेख शासन निर्णयात करीत असतो. यावरून असे दिसून येते की, शासन निर्णय/ अधिसूचना / कायदा दुरुस्तीची माहिती दिल्यास तसेच इतिवृत्ताची प्रत दिल्यास या परंतुकातील तरतूदींची पूर्तता होते. थोडक्यात परंतुकातील तरतूदींच्या पूर्ततेसाठी मंत्रिमंडळाची टिपणी त्या अनुषंगाने विविध खात्याअंतर्गतचे अभिप्राय उघड करण्याची आवश्यकता वाटत नाही. तसेच मंत्रिमंडळामध्ये जी चर्चा होते त्याची इतिवृत्तामध्ये समावेश करण्याची प्रथा प्रचलीत नाही. इतिवृत्तामध्ये फक्त निर्णय नमूद करण्याची प्रथा आहे. त्यामुळे मंत्रिमंडळातील चर्चेची कोणतीही नोंद नसल्याने ती कागदपत्रे देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अपिलीय प्राधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८ (३) च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे युक्तिवाद केला: - ८ (१) (झ) चे परंतुक व कलम ८ चे उप कलम ३ एकत्रित वाचून कायद्याचा अर्थ लावणे आवश्यक आहे. कलम ८ च्या उप कलम ३ नुसार एखाद्या घटनेला / निर्णयाला २० वर्षाचा कालवधी होवून गेल्यानंतर कलम ८ (१) नुसार माहिती उघड करण्यातील सुट (अपवाद) शिल्लक राहत नाही. म्हणजेच घटनेपासुन / निर्णयानुसार २० वर्षानंतर माहिती देण्यातून अपवाद करावयाचा नसून माहिती द्यावयाची आहे. पण हे करतांना सुध्दा कलम ८ (१) मधील खंड (क) (ग), (झ) मधील तरतुदीच्या अधिनतेनेच उप कलम ३ मधील तरतूद लागू होते. म्हणजेचे उप कलम १ च्या खंड (क) (ग), (झ) मधील माहिती (अर्थात भारताची एकात्मता, सुरक्षितता या विषयीची माहिती विधी मंडळाच्या किंवा संसदेच्या हक्कभंगास कारणीभूत ठरु शकणारी माहिती वगैरे आणि मंत्रिमंडळ कागदपत्रे) ही २० वर्षानंतर सुध्दा उप कलम ३ अन्वये उघड करावयाची नाही. हा युक्तिवादही पटण्यासारखा असुन माझे मत आहे की, कलम ८ (१) (झ) चे पंरतुकाची शब्दरचना व उप कलम ३ मधील केलेल्या खंड (क) (ग), (झ) चा अपवाद विचारात घेता मंत्रिमंडळ निर्णयानंतर व २० वर्षानंतर सुध्दा मंत्रिमंडळ बैठकीची संपूर्ण

कागदपत्रे उघड करणे अपेक्षित नाही. त्यामुळे कलम ८(१) (झ) चे परंतुकातील शब्दरचना महत्वाची असुन निर्णय व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सुध्दा काय करावे हे सदर परंतुकात स्पष्टपणे नमूद केले आहे.

उपरोक्त मुद्यांशिवाय भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ मध्ये शासनाचा कार्यव्यवहार कोणत्या पध्दतीने चालविला जाईल याबाबत तरतूद केली असुन या कालमाच्या १६६(३) अन्वये मा.राज्यपालांना शासकीय कार्य नियमावली करण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे ती शासन कार्य नियमावली (Rules of Bussiness) करण्यात आली आहे. त्यामधील भाग २ (सर्वसाधारण) मधील सूची क्र.३० अन्वये सुध्दा मंत्रिमंडळाची कागदपत्रे गुप्त स्वरूपाची असतील असे स्पष्ट आहे. ही सूचना भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ असल्याने घटनादत्त तरतुदीच्या आधारे सुध्दा मंत्रिमंडळाची कागदपत्रे देणे बंधनकारक नाही. राज्य घटनेच्या अनुच्छेद १६६ अन्वये मा.राज्यपालांनी केलेल्या शासन कार्य नियमावलीस, माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतूदी निष्प्रभावित करू शकत नाहीत. कारण ही कार्य नियमावली राज्य विधी मंडळाने बनविलेल्या एखाद्या काद्यातील तरतूदीनुसार तयार केलेली नाही, तर राज्य घटनेतील तरतूदीनुसार बनविलेली आहे. त्यामुळे कार्य नियमावलीतील गुप्ततेची तरतूद, माहितीचा अधिकार अधिनियम कलम २२ नुसार निष्प्राभावित होत नाही ही बाब पटण्यासारखी आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४ (३) अन्वये प्रत्येक मंत्र्याने गोपनीयतेची शपथ घेणे आवश्यक आहे. या गोपनीयतेच्या टिपणीचा मसूदा भारतीय राज्य घटनेच्या शेडयूल ३ (vi) मध्ये दिलेला असुन मा.मंत्री त्यांच्यासमोर असलेली कोणतीही माहिती त्यांनी मंत्री म्हणुन धारण केलेली जबाबदारी पार पाडण्याखेरीज उघड करणार नाही अशी तरतुद आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असाही युक्तिवाद केला की, माहितीचा अधिकार अधिनियम यासह कोणत्याही कायद्यातील तरतुदी या राज्यघटनेतील गुप्ततेच्या शपथेला निष्प्रभ करू शकत नाहीत. तसेच मंत्र्यांनी घेतलेल्या, गुप्ततेच्या शपथेमुळे येणारे वैयक्तीक बंधन, मंत्री मंडळाचे सामूहिक जबाबदारीचे तत्वानुसार संपूर्ण मंत्रिमंडळास व मंत्रिमंडळासमोर विचारार्थ येणा-या मंत्रिमंडळ प्रस्तावांनाही लागू आहे.

मंत्रिमंडळ बैठकीचे वेळेस, Cabinet Note मधील काही मुद्यांना काही वेळेस वित्त नियोजन यासारख्या इतर खात्यांच्या सचिवांचा विरोध असतो याबाबत चर्चाही होते. पण त्या त्या खात्यांच्या मंत्री महोदयांची याबाबत काय धारणा आहे हे स्पष्ट होतेच असेही नाही व मी वर उल्लेख केल्याप्रमाणे हया चर्चेची नोंद करण्याची प्रथा महाराष्ट्रामध्ये नाही. अशा परिस्थितीत एकदा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर तो एकमताने झाला असेच गृहित धरण्यात येते. त्यामुळे गुप्ततेची शपथ सामूहिक जबाबदारीचे तत्त्वानुसार मंत्रिमंडळ प्रस्तावांनाही लागू होते असे अभिप्राय आहेत.

उपरोक्त विवेचन पहाता, मंत्रिमंडळ बैठकीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करण्याची अपिलीय प्राधिका-यांने, विनंती नाकारण्याची केलेली कार्यवाही कायदेशीर तरतूदीनुसार सुसंगत आहे.

सुनावणीच्या दिवशी असे ही निदर्शनास आणण्यात आले की, माहिती मागण्याचा मूळ अर्ज दि.२१.०४.२००७ चा आहे व विषयांकित कायद्यावर राज्यपालांच्या मंजुरीची सही दि.२९.११.२००७ ला झाली असुन कायदा दि.०१.१२.२००७ रोजी प्रसिध्द झाला आहे. त्यामुळे मूळ माहितीचा अर्ज आला तेव्हा माहिती नाकारण्याची कार्यवाही तात्कालिन परिस्थितीत योग्य होती व संबंधित अपीलार्थींच्या युक्तिवादात असे दिसून आले की, त्यांना आता कायदा / निर्णयाच्या प्रती मिळाव्यात आणि त्यांना

Cabinet Note नको आहे असे चर्चेच्या वेळी आढळून आले. त्यामुळे अपील निकाली काढावे असे अभिप्राय आहेत.

वरीलप्रमाणे सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपीलावर दि.०४.०६.२००७ व दि.१८.०७.२००७ रोजी दिलेला निर्णय बहुमताने रद्दबादल (set aside) करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व अपीलकर्ता यांचे अपील मान्य करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मान्य करण्यांत येत असून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी घेतलेली उपरीनिर्दिष्ट निर्णय बाजूला ठेवत आहे व अपिलार्थीने मागणी केलेली UCLR Act बाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या निर्णयाशी संबंधित खालील माहिती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी देण्याचे आदेशित करत आहे.

(१) मंत्रीमंडळाचा निर्णय, म्हणजे शासन निर्णयाची प्रत (The decision taken by the Cabinet).

(२) ज्या आधारावर हा निर्णय घेण्यात आला आहे तो सामुग्री म्हणजे "मंत्रिमंडळाची टिपणी."

(The Materail on the basis of which the decision has been taken)

(३) निर्णयाची कारणे (वरील एक दोन मध्ये समाविष्ट असतात.)

२. सदरच्या निर्णयाची एक पत्र अपीलकर्ता, उत्तरवादी यांना देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| **(विलास पाटील)**<br>**मा.मुख्य माहिती आयुक्त,**<br>**महाराष्ट्र राज्य** | **(भास्कर पाटील)**<br>**मा.राज्य माहिती आयुक्त,**<br>**अमरावती विभाग** | **(दि.बा.देशपांडे)**<br>**मा.राज्य माहिती आयुक्त,**<br>**औरंगाबाद विभाग** |
| **(पी.डब्ल्यू.पाटील)**<br>**मा.राज्य माहिती आयुक्त**<br>**नागपूर विभाग** | **(नवीन कुमार)**<br>**मा.राज्य माहिती आयुक्त**<br>**कोकण विभाग** | **(एम.एच.शहा)**<br>**मा.राज्य माहित आयुक्त**<br>**नाशिक विभाग** |

**Before the State Information Commission, Maharashtra-Appeal under section 19(3) of RTI Act, 2005.**

**Appeal No.5842/02**

**Shri. S. Anandnatraj** **…. Appellant**
**B/706, Rajeshwari Apartment,**
**Mahavir Nagar, Kandivali (w),**
**Mumbai-400 067**

**V/s.**

**First Appellate Authority and** **…. Respondent**
**Registrar General,**
**High Court,**
**Mumbai-400 032.**

**Public Information Officer and**
**Master Assistant Prothonotary**
**(Administration), High Court,**
**Mumbai-400 032.**

**JUDGEMENT**

| | |
|---|---|
| **Date of Second Appeal** | **: 07-08-2009** |
| **Date of Hearing** | **: 14-03-2011** |
| **Appellant** | **: Present** |
| **Public Information Officer** | **: Present** |
| **First Appellate Authority** | **: Absent** |

Appellant has submitted an application under Section 6(1) of the Right to Information Act-2005, on 24.02.2004 to the Public Information Officer, in the Office of the Registrar, Bombay High Court-Mumbai to seek the information in respect of Writ Petition No. 2650 of 95 and 2689 of 95, to furnish the photo-copies of all papers filed and order issued in respect of the petition. The information is required in person.

2. The Public Information Officer and Master Assistant Prothonotary (Administration) on 25th February 2009 has expressed his inability to furnish the information, stating that an Application was not complete in all respect as received as per the Bombay High Court Right to Information Rules, 2006. As per the said Rules, the Court Fee Stamp of Rs. 12/- is required on the

application, however, the Rs. 10/- Court Fee Stamp is affixed. Hence there is deficit Court Fees of Rs. 2. As per the said Rules, Applicant has to submit application in prescribed format. Please see High Court website "bombayhighcourt.nic.in" for the said Rules. Moreover, in view of the provision to Rule 9 and Rule 19 of the Bombay High Court Right to information Rules, 2006, the information in respect of judicial proceeding or records cannot be supplied under Right to Information Act, 2005 but you may obtain the said information as per the procedure prescribed in the Bombay High Court Rules and Orders.

3. Aggrieved by the reply of the Public Information Officer, the Appellant has preferred the first appeal to the First Appellate Authority and Registrar General on the ground that the Bombay High Court Right to Information Rules, 2006, are not consistent and in agreement with the provisions of the Right to Information Act, 2005. As provided in Rule 9 of the said Rules, that is, Rule 9 in para 1 obtaining information in respect of third party is permissible by submission of application in Form "A" as per Rule 3, the same rule in para 2 forbids the information of 3rd party in respect of judicial proceedings and records. The said contradiction in clause 9 needs proper interpretation/classification by the Public Information Officer in his reply.

4. The First Appellate Authority and Registrar General on 11.05.2009 decided that "Looking to the above, it is clear that the reply sent by Public Information Officer cannot be faulted with. The information sought is relating to record of judicial proceedings and copies of the same can be obtained by applying at the facilitation center of the High Court" and the appeal is disposed off accordingly.

5. Therefore, again aggrieved by the decision of the first appeal the appellant has preferred second appeal under Section 19(3) of the Right to Information Act-2005, before the State Information Commission on 21.09.2009.

6. The second appeal was heard by Shri. Ramanand Tiwari, State Information Commissioner, Brihanmumbai, on 21.10.2009 but adjourned on the behest of Public Information Officer and the next hearing took place on 23.03.2010. The respondents submitted that appellant in his second appeal has stated that the (As per provisions of section 22 mentioned above rules made by any Competent Authority, (in this case) the Chief Justice of Bombay High Court cannot negate the provisions of the Right to

Information Act-2005, since neither section 8 nor section 24 gives an exemptions in respect of providing information related to judicial proceedings and records). In view of this the Respondents submit that nothing can be done administratively or under the Right to Information Act.

In view of the facts and circumstances mentioned herein above, the respondents submit that the second appeal has, therefore, no merits and deserves to be dismissed/rejected. However the State Information Commissioner, Shri Ramanand Tiwari on 26.03.2010 passed an order that since the issues involved are very important I suggest that the case should be heard by the full bench of the Commission or least a bench consisting of three Commissioners and directed to Secretary of the Commission to obtain the orders of the CIC and do the needful.

The Chief Information Commissioner, then passed orders that the Bench consisting Chief Information Commissioner, Dr. Suresh Joshi, Shri. Ramanand Tiwari SIC, Shri. Vilas Patil SIC, Shri. Bhaskar Patil SIC should heard the appeal:

During the hearing on 25.06.2010, the bench heard both the sides and sought from the Respondent No. 1, details of the copy of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules 2009 and the copy of the Bombay High Court rules and orders prescribing the procedure to obtain the certified copies of the judicial proceeding and Records to persons who are not party of the said suit or matter.

Therefore the Public Information Officer has submitted a copy of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules 2009 and the extract of Bombay High Court Rules and Orders.

However, after tenure of Dr. Suresh Joshi as a Chief Information Commissioner is over and new Chief Information Commissioner is appointed was necessary to recast the bench and accordingly the bench is recasted consisting

1) Shri. Vilas Patil, Chief Information Commissioner.
2) Shri. Bhaskar Patil, State Information Commissioner, Amravati
3) Shri. D. B. Deshpande, State Information Commissioner Aurangabad,

is formed to hear the appeal and the bench heard appeal on 14$^{th}$ March 2011.

7. During hearing the Appellant has submitted his written statement and argued also that,

"On examining and going through the rule under Chapter XIX, rule 267 and 268 and the Bombay High Court Right to information (Revised) Rules 2009, pertaining to the issue of copies of judicial proceedings and records to persons who are not a party to the suite or matter, it is seen that,

1) The Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009 has sought to continue with the rules and conditions prevailing before the enforcement of the Right to Information Act, 2005 in respect of issue of judicial proceedings and records to persons who are not a party to the suite or matter under Chapter XIX rule 267 and 268. In addition, they have also barred information on decisions taken administratively or quasi judicially to person who are not a party to the said matter or decisions under Rule 13, of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009.

2) On examining of Chapter XIX rule 267 and 268 and in particular in respect of rule 268 it is clear that the said rule is discriminatory, restricted, denying, refusing or depriving an applicant of information which he is entitled to under the Right to Information Act, 2005 as seen and is evident from the provisions of the said rule reproduced below.

**Rule 268:-**

a) "The Prothonotary and Senior Master may… in his discretion……. On sufficient cause being shown allow search or grant certified copies………"

CLARIFICATION: 1
Sub section (2) of section 6 of RTI Act 2005 clearly states that no sufficient cause or reason is required to be furnished by the applicant in respect of information sought under Right to Information Act, 2005. Rule 268 therefore violates above mentioned section as reproduced below:

b) "………. The Prothonotary and Senior Master may,….. on sufficient cause being shown….. in his discretion, grant such copies"

CLARIFICATION: 2

The applicant is entitled to the information sought under Right to Information Act 2005, since no Public Authority or authorized official can be accorded a blanket discretionary power to allow or deny information without specific provisions under the Right to Information Act 2005.

3) Similarly rule 13(f) and the appended note at the end of rule 13 are contradictory to the provisions of the Right to Information Act 2005, and therefore would be ultra-vires and illegal and consequently unenforceable.

4) It is important to reiterate that section 28 of the Right to Information Act states that the Competent Authority that is the Chief Justice, Bombay High Court, may by notification in the official Gazette makes rules to carry out the provisions of this Act, (emphasis added) which evidently means that the rules framed by a Competent Authority. Under section 28 of the Right to Information Act can only be, - for giving effect to and for carrying out the provisions of Right to Information Act and such rules cannot be for frustrating, negating, denying, refusing or depriving an Applicant of the information to which he would be entitled to under the provisions of Right to Information Act 2005.

5) The Right to Information Act is Central Act of the parliament and Section 22 of the Right to Information Act 2005 states that the provisions of the Right to information Act shall have an overriding effect over any other law.

6) Proceedings and records related to suits and matter that are held in the **"Open Public Domain"** is not barred u/s. 8, 9 and 24 of the Right to Information Act 2005 and is also not covered u/s. 11 of the Right to Information Act.

7) The appellant has only sought xerox copies of the judicial proceedings and records and not Certified Copies as provided for by the Bombay High Court Right to Information (Revised) Rules 2009.

It is in the light of the above explanations and submission, the undersigned appellant states that the refusal and denial of the information by the respondent No. 1 and 2 sought application dated 24/02/2009 which is not

barred u/s. 8, 9 of 24 of the Right to Information Act 2005 is unjustified and contrary to the provisions of the Right to Information Act 2005.
Under the circumstances, the appellant seeks appropriate orders from the Hon. Bench as under:-

(i) The Hon. Bench confirm and conclude that the provisions under rule 10(3) and 13(f) and the appended note of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules 2009 is contrary to the provisions of the Right to Information Act 2005 and therefore would have to be amended to confirm with the provisions of Right to Information Act 2005.

(ii) Accordingly the Hon. Bench may please issue direction under sub.sec. (5) of section 25 of the Right to Information Act 2005 recommending amendment to the rules appropriately in order to confirm the provisions of Right to Information Act 2005.

(iii) In the meantime, the Hon. Bench may also issue appropriate orders to the respondent No. 1 and 2 to furnish the xerox copies of the information called for by the appellant under Right to Information Act vide application dated 24/02/2009".

8. The respondent Public Information Officer has also submitted written statement and argued that the Public Information Officer and the First Appellate Authority has acted according to the rules that is the Bombay High Court Right to Information Rules 2006 and revised rules 2009, which are made by the Chief Justice of the High Court of Judicature at Bombay being the "Competent Authority" under section 28 of the Right to Information Act 2005.

9. The main contention of the Appellant is that the rules framed by the Competent Authority under section 28 of the Act, can only be for giving effect to and for carrying out the provisions of the Act and cannot be contrary to the provisions of the Right to Information Act they would be ultra-vires and illegal and consequently unenforceable in view of the provisions of section 22 of the Act.

The Chief Justice of Bombay High Court cannot negate the provisions of the Right to Information Act, since neither section 8 nor section 24 gives an exemptions in respect of providing information related judicial proceeding and records.

10. Hence, it is necessary to examine the rules of Interpretation of the Statutes.

Once the Legislature has passed the Act, it is subject to judicial review in respect of the Constitutionality and the implementation of the provisions of the said Act.

No doubt, the rules made in exercise of the powers delegated under the principal Act, for carrying out the purposes laid down in the principal Act, cannot travel beyond the scope of the Act, nor can they, themselves, enlarge the scope of statutory provisions. They cannot also militate against the provision under which they were made (AIR 1956 SC, AIR 1957 SC 532).

However, the Rules framed under the Act have the force of Law. (AIR 1954 All 639)

Therefore, the function of the Court is to apply the law as it stands. It is not for the Court to re-write the law, even though the Court notices anomalies and omission and considers the provisions as they stand unreasonable (AIR 1982 Ker 126).

In view of such principals of interpretation of Statutes, the Commission has to give the decision as per the rules framed by the Hon. Chief Justice of High Court of Judicature of Bombay as a Competent Authority under section 28 of the Act.

Therefore, the decision of the First Appellate Authority is upheld and there is no necessity to interfere the order of the First Appellate Authority.

However, in view of the points raised by the appellant, the Commission, in view of the provisions of section 25(5) of the RTI Act, recommends to the Public Authority, that is Hon. High Court to examine judicially the rules framed by the Hon. Chief Justice of Bombay High Court, whether they are in conformity with the provisions or spirit of the RTI Act and if, found not to be in conformity with the provisions or spirit of the Act, then take such steps to promote such conformity.

## ORDER

1) **Hence appeal is partly allowed.**
2) **The copies of the decision to be given to parties.**

**Date : 29.04.2011**
**Mumbai**

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| **Vilas Patil**<br>**State Chief**<br>**Information Commissioner** | **Bhaskar Patil**<br>**State Information**<br>**Commissioner, Amravati** | **D.B.Deshpande**<br>**State Information**<br>**Commissioner, Aurangabad** |

**राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत.**

**सचिव,**
**राज्य माहिती आयोग**

**प्रत,**

१) निवडनस्ती
२) स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :मुमाआ२०११/तक्रार क्र. १५७८/०१.**

**श्री. अनिल गलगली,**
**जुना खारवाला चाळ, काजूपाडा,**
**साकिनाका, मुंबई ४०० ०७२.** **... तक्रारदार**

**---विरुध्द---**

**उपाध्यक्ष, रिलायन्स एनर्जी लिमिटेड,**
**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,**
**रिलायन्स एनर्जी लिमिटेड,**
**सांताक्रुझ (पू) मुंबई ४०० ०५५.** **... गैरतक्रारदार**

**---निर्णय---**

**सुनावणीचा दिनांक - १४/०३/२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**उपाध्यक्ष, रिलायन्स एनर्जी लिमिटेड - अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १५/१२/०८ रोजी जन माहिती अधिकारी, रिलायन्स एनर्जी, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, यांच्याकडे वीज देयक हस्तांतरण प्रक्रिया दि. ०१/०९/२००५ पासून तसेच (१) वीज देयक खाते क्रमांक.१०१२९५७२३ हस्तांतण केव्हा व कोणाचे नावाने करण्यात आले. (२) हस्तांतारण करताना खाते क्र. १०१२९५७२३ मध्ये क्रेडीट दाखविली गेलेली रक्कम नवीन खाते क्र.१५०१४४५३७ मध्ये हस्तांतरण न करण्याचे कारण काय आहे.(३) वीज देयक हस्तांतरित करताना सर्व कागदपत्रे जमा केल्यानंतर हस्तांतरण होत असताना क्रेडीट रक्कम हस्तांतरित न करण्याचे कारण काय आहे व दि. ०१/१२/२००८ रोजी श्री.अनिल गलगली यांनी केलेल्या अर्जावर कोणती कारवाई केली. (४) ज्याअर्थी क्रेडिट रक्कम पूर्वीच्या खात्यातून हस्तांतरित झाली नाही त्याअर्थी हस्तांतरण अजूनही पूर्ण झालेले नाही व ती अजूनही प्रक्रियेत आहे.(५) हस्तांतरण करताना वीजदेयक खाते बदलून

नवीन खाते देण्यासंबधात वीज नियामक आयोगाने निश्चित धोरण ठरविले आहे अथवा वीज कायदाप्रमाणे तशी तरतूद आहे. अशी सर्व माहिती व्यक्तीशः मिळावी म्हणून मागितलेली दिसून येते.

२. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दि. २०/१२/२००८ रोजी उपाध्यक्ष रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अन्वये दि. ०७/०१/२००९ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. परंतु दि.०८/११/२०१० रोजी तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे तक्रारीसंदर्भात स्मरणपत्र दाखल केलेले आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.२२/१२/२०१०, दि २१/०१/२०११ रोजी सुनावणीच्या नोटीस काढण्यात आलेल्या आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०८/११/२०१० रोजीच्या स्मरणपत्राच्या सदंर्भामध्ये दि. २०/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस लेखी युक्तीवादात आयोगापुढे असे सांगितले की, मा. उपाध्यक्ष, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड मुंबई, किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तरी त्यांचे म्हणणे लेखी देत आहे, मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही ग्राहकांना वीज पुरवणारी कंपनी आहे व ग्राहक म्हणून उपनगरातील लाखो नागरिकांना सेवा पुरविते. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाद्वारे मेसर्स रिलायन्सला परवाना मिळाला आहे. ही कंपनी आवश्यक सेवा पुरविणारी असल्यामुळे नागरिकांच्या दृष्टिकोनातून ही कंपनी खाजगी कशी असू शकते? ज्याअर्थी परवाना घेऊन वीज पुरवित आहे त्याअर्थी आयोगाचे सर्व नियम लागू आहेत. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीची वेबसाइट पहाणी केली असता सर्व पब्लिक शेअर होल्डींग ५७.११% आहेत. ज्याअर्थी पब्लिक शेअर होल्डींग मधील अधिकांश संस्थाना माहिती अधिकार लागू होतो त्याअर्थी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीला सुध्दा हेच निकष लागू होतात. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टिने याबाबत व्यावहारिक स्तरावर आपण निर्णय घेतला तर उपनगरवासियांना आपल्या जोडणी क्रमांकापासून विविध तक्रारीसाठी माहिती अधिकाराचा वापर करता येईल.ही कंपनी सार्वजनिक प्रधिकरण म्हणून का संबोधण्यात येऊ नये? तर आपण योग्य तो निर्णय द्यावा असा विनंती अर्ज आयोगापुढे दिलेला आहे व सोबत सदर कंपनीच्या पब्लिक शेअर होल्डर्स संदर्भातील माहिती ही आयोगाकडे दाखल केलेली आहे.

३. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात तक्रारदाराने उपस्थित केलेला मुद्दा हा एखाद्या खाजगी कंपनीस 'माहितीचा अधिकार' लागू हातो किंवा नाही असा महत्त्वाचा असल्यामुळे सदरच्या तक्रारी संदर्भात माहिती आयोगाच्या तीन सदस्यांच्या खंडपीठापुढे सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक वाटल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी १. मुख्य माहिती आयुक्त २.राज्य माहिती आयुक्त, अमरावती ३. राज्य माहिती आयुक्त, नाशिक यांचे खंडपीठ घटीत करावे व तक्रारीची सुनावणी घ्यावी असे आदेश दिल्यामुळे दि. २५/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयुक्ताचे कार्यालयातून १४/०३/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे अशी नोटीस काढण्यात आलेली होती. त्याप्रमाणे दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे उपाध्यक्ष यांनी आयोगापुढे युक्तीवाद केला व त्यांनी दि. २१/०१/२०११ रोजी लेखी युक्तीवाद दिला होता तो आयोगाच्या निदर्शनास आणला. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे उपध्यक्ष यांनी

युक्तीवाद करताना असे सांगितले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी असून शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा सवलती या कंपनीस मिळत नाहीत त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून जी व्याख्या केलेली आहे त्या व्याख्येमध्ये सदरच्या कंपनीचा समावेश होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार लागू होत नाही. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी १९२९ मध्ये कंपनी ॲक्ट १९१३ च्या तरतूदीप्रमाणे स्थापन झाली आहे व ती रिलायन्स ग्रुपचा भाग आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीचे वीज उत्पादन, वीज वितरण इ. व्यवसाय आहेत. तसेच रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी संविधानाप्रमाणे किंवा कोणत्याही संसदेच्या कायद्याप्रमाणे किंवा शासनाच्या आदेशाप्रमाणे घटीत झालेली कंपनी नाही किंवा शासन मालकीची सुध्दा नाही, तसेच शासनाचे नियंत्रण सुध्दा नाही किंवा या कंपनीस शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. त्यामुळे या कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

४. तक्रारदार यांनी पुन्हा युक्तीवाद करताना असे सांगितले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी मुंबई उपनगरामध्ये वीज नियामक आयोगाने दिलेल्या अनुज्ञपती प्रमाणे वीज वितरणाचे काम करते व वीज नियामक आयोग हे इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या तरतूदी प्रमाणे स्थापन झालेले आहे व इलेक्ट्रीसिटी ॲक्ट हा संसदेचा कायदा आहे. वीज वितरणाचे काम हे एक सार्वजनिक सेवा असल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होणे आवश्यक आहेत. जेणेकरुन रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनी कडून वीज ग्राहकांवर जो अन्याय होतो त्याकरिता त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे, तरी सदरच्या अधिनियमाच्या तरतूदी लागू होतात असे तक्रारदार यांनी पुन्हा प्रतिपादन केल्यामुळे ज्या वीज नियामक आयोगाने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस अनुज्ञप्ती दिलेली आहे त्या वीज नियामक आयोगाचे अभिप्राय मागणे खंडपीठास आवश्यक वाटल्यामुळे दि. २१/०४/२०११ रोजी अधिनियमाचे कलम १८ (३) चे अधिकाराचा वापर करुन अंतरिम आदेश पारित करुन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे अभिप्राय मागविले .महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे अवर सचिव यांनी वीज नियामक आयोगाचे अभिप्राय आयोगापुढे सादर केलेले आहेत. त्यामध्ये इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे वीज वितरण इ. संदर्भात असलेल्या अधिनियमांप्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला कलम १४ प्रमाणे मुंबई उपनगरासाठी वीज वितरणाकरिता अनुज्ञप्ती दिलेली आहे. तसेच वितरण म्हणजे सदरच्या परिसराला वीजपुरवठा करणे व ही सार्वजनिक सेवा आहे असे अभिप्राय दिलेले आहेत, असे म्हटलेले आहे.

५. तक्रारदार, गैरतक्रारदार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी व महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांचे युक्तीवाद व अभिप्राय विचारात घेऊन खालीलप्रमाणे मुद्दा हा विचारात घेण्यात येतो.
" इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे स्थापन झालेल्या विज नियामक आयोगाने अधिनियमाच्या कलम १४ प्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीस विज वितरणाचे हक्क अनुज्ञप्तीने ( Licence) दिलेले असल्याने रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस विज वितरणाचे हक्काचे मर्यादेपर्यंत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात काय? "

६.	रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी असल्यामुळे व शासनाची मालकी किंवा नियंत्रण नसल्यामुळे किंवा शासनाच्या आदेशाप्रमाणे स्थापन झालेली नसल्यामुळे तसेच शासनकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्यामुळे, माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतूदी या कंपनीस लागू होत नाही, असे जे म्हटले आहे त्यानुसार माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २ (ज) मध्ये 'सार्वजनिक प्रधिकरण' या

संज्ञेच्या व्याखेमध्ये समावेश होतो किंवा नाही ही बाब तपासणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २ (ज) मध्ये 'सार्वजनिक प्रधिकरण' याचा अर्थ,

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये ;

(रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही संविधानाद्वारे स्थापन झालेली नाही.)

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;

(संसदेने इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ हा पारित केलेला आहे.)

या कायद्याच्या तरतूदीप्रमाणे राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग स्थापन केलेले आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगास संसदेच्या अधिनियमाप्रमाणे वीज निर्मिती, वीज वितरण वीज पारेषण इ. संदर्भामध्ये नियंत्रण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम १४ प्रमाणे वीज वितरणाकरिता एखाद्या खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीला अनुज्ञप्ती देऊन वीज वितरणाचे हक्क देण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस मुंबई उपनगर या परिसरासाठी वीज वितरणाचे अधिकार देण्यात आलेले आहेत.)

(ग) राज्य विधी मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाची स्थापना नाही.)

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित

करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यामध्ये;

**(एक)** समुचित शासनाची मागणी असलेली, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणत वित्त पुरवठा केला जातो असे निकाय;

**(दोन)** समुचित शासनाकडून निधीद्वारे तिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशी अशासकिंय संघटना , यांचा समावेश होतो ;

प्रत्यक्ष समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला हक्क देण्यात आलेले नसले तरी शासनाने स्थापन केलेल्या आयोगाने वीज वितरणाचे हक्क दिलेले आहेत.

७.	वरील व्याख्येप्रमाणे संसदेने पारित केलेल्या इलेक्ट्रिक ॲक्ट २००३ च्या तरतूदीप्रमाणे 'समुचित शासनाने' 'महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग' स्थापन केला असुन व त्या वीज नियामक आयोगाने विशिष्ट परिसरात वीज वितरणाचे हक्क एखाद्या कंपनीला दिले असल्यास वीज वितरणाचे हक्क हे

अप्रत्यक्षपणे शासनानेच एखाद्या कंपनीला दिले आहेत असा त्याचा अर्थ घेणे आवश्यक आहे. वीज वितरण ही सार्वजनिक सेवा आहे व वीज वितरणाशी सेवा क्षेत्र म्हणून थेट ग्राहकांचा संबध येतो. महाराष्ट्रामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका वीज वितरणाचे अधिकार हे बेस्ट या महानगरपालिकेच्या उपक्रमाचे आहेत. महानगरपालिका हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. पर्यायाने बेस्ट या उपक्रमास सुध्दा लागू होतो. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहक हे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार बेस्ट उपक्रम वीज वितरण संदर्भात माहिती मागू शकतात. उर्वरित महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र राज्य वीजवितरण कंपनीकडे वितरणाचे हक्क आहेत. परंतु, त्या कंपनीचे संपूर्ण नियंत्रण हे शासनाकडे आहे व तो शासनाचा उपक्रम आहे. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रामध्ये वीज वितरणाचे हक्क हे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे दिलेले असल्यामुळे त्या कंपनीस सुध्दा शासकिय उपक्रम म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात व त्या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहक हे वीज वितरण संदर्भामध्ये माहिती मागू शकतात. यावरुन विज वितरण हे सार्वजनिक सेवा क्षेत्रात येत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका व उर्वरित महाराष्ट्रतील वीज ग्राहकांना वीज वितरण संदर्भामध्ये माहितीचा अधिकार हा वापरता येतो. परंतु केवळ रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी ही खाजगी कंपनी आहे व ती शासनाने स्थापन केलेली नाही किंवा शासनाची मालकी किंवा शासनाच्या नियंत्रणात येत नाही. या कारणास्तव त्या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहकांना त्यांच्या अत्यावश्यक सार्वजनिक सेवे संदर्भामध्ये माहितीच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हे त्यांच्यावर अन्यायासारखे आहे व ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रस्ताविकेत दिलेल्या उद्देशाशी विसंगत होईल. अधिनियमातील प्रस्ताविकेमध्ये;

"आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितीगार नागरी समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ति च्या कार्यशीलतेच्या दृष्टिने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यासाठी उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टिने अत्यावश्यक आहेत;............
त्या अर्थी, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविध माहिती पुरविण्याकरिता तरतूदी करणे इष्ट आहे."

८. वरील उद्देशाप्रमाणे मुंबई उपनगर जिल्हा या कार्यक्षेत्रात रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीला वीज वितरणाचे हक्क सेवा क्षेत्र म्हणून दिलेले असल्याने त्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना सुध्दा ती सार्वजनिक सेवा क्षेत्र म्हणून कार्यरत असल्यामुळे माहिती मिळविण्याचा हक्क आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सार्वजनिक क्षेत्रातील माहिती मिळण्याचा नागरिकांच्या हक्कासाठी पारित झालेला असल्याने अधिनियमाच्या तरतुदींचा काटेकोरपणे अर्थ न घेता प्रास्ताविका, व इतर सर्व तरतुदींचे एकत्रित वाचन करुनच नागरिकांच्या दृष्टीने फायदेशीर अर्थ लावणेसाठी स्थूलमानाने निर्णय करणे आवश्यक आहे. अन्यथा काही क्षेत्रातील नागरिकांना एखाद्या सेवा क्षेत्रातील माहिती मिळविण्याचे करीता वंचित ठेवणे हे भेदभाव करण्यासारखे होईल. तसेच "सेवा क्षेत्र" , सार्वजनिक सेवा याबद्दल मा. न्यायालयाचे निर्णय अवलोकन करणे संयुक्तीक राहील.

According to Encyclopaedic Law Lexican 21st Century Unabridged Edition by Justice C.K. Thakker, Ashoka Law House New Delhi (India) " Public utilities:- A publicity or privatelu owned company that sells

electricity, natural gas, telephone service, water, other utilities. Most utilities operate as monopolies in their respective geographical areas."

"Public Utility Undertaking- There is no statutory definition of "Public Utility" in the context of Indian Enactment that may be relevant for our present purpose. There is a definition of "Public Utility Service" in Section 2(n) of the Industrial Disputes Act, 1947, which inter alia, covers " any industry which supplies power, light or water to the public and certain notified industries. (AIR 1990 SC 1851) व त्यामुळेच समुचित शासनाने जरी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग स्थापन केलेला असला तरी त्याच आयोगाने अधिनियमांच्या तरतूदीप्रमाणे वीज वितरणाचे हक्क सेवा क्षेत्र म्हणून त्या कंपनीस दिलेले असल्यामुळे अप्रत्यक्षपणे ती शासनाचीच सेवा ठरते असा निकर्ष काढावयास हरकत नाही.

The term "licence" is usable in three possible sense. In its most natural sense,
"licence" is an authority justifying the doing what otherwise would be worngful. It is in the nature of a grant of permission to exercise certain privilege, or carry on a particular business, to pursue a certain occupation etc. A licence may be two kinds, namely, a bare licence which is purely a matter of personal privilege and a licence coupled with a grant or interest. If a licence is coupled with a grant or interest than the grantor cannot in general revoked it so as to defeat the grant to which it is incident. In order to grant licence a man need not be its owner. (AIR 1998 Bom 107)

९. एखाद्याने स्वतःचे अधिकार हे दुसऱ्या व्यक्तीला प्रदान केले असले तरी मूळ अधिकार प्रदान करणाऱ्याकडेच असतात, असे कायद्याचे तत्व आहे.

"Deligation does not imply a parting with power by the person who grants the deligation but points rather to conferring of an authority to do certain things which otherwise the person would have to do himself." (AIR 1963 MP 74)

१०. तसेही वीज वितरण ही सेवा सार्वजनिक असल्यामुळे इलेक्ट्रिक ॲक्ट २००३ च्या कलम १५ प्रमाणे एखाद्या कंपनीस वीज वितरणाचे हक्क द्यावयाचे असल्यास, त्या कंपनीस ग्राहकांचे अभिप्राय व हरकती मागविण्यासाठी वर्तमापत्रामध्ये नोटीस प्रसिध्द करावी लागते व अशी नाटीस प्रसिध्द करुन त्या क्षेत्रातील वीज ग्राहकांनी जे अभिप्राय किंवा हरकती घेतल्या असतील, त्या वीज नियामक आयोगाने विचारात घेऊन मगच त्या कंपनीला अनुज्ञप्ती द्यावयाची की नाही असा निर्णय घ्यावयाचा असतो. याचा अर्थ अधिनियमात सुध्दा ग्राहकांच्या हितास महत्त्व देण्यात आलेले आहे. इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ चे कलम १०८ प्रमाणे ;

" शासनाला महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सार्वजनिक हिताच्या धोरणांच्या संदर्भात निर्देश देण्याचे अधिकार आहेत आणि त्याबाबतीत शासनाचे अधिकार हे अंतिम आहेत. "

११.	यावरुन राज्यातील वीज निर्मिती, वीज नियंत्रण,वीज वितरण किंवा वीज व्यापार यासंदर्भात राज्य शासनाचेच नियंत्रण असल्यामुळे त्या संदर्भात वीज वितरण करणाऱ्या कोणत्याही कंपनीवर नियंत्रण आहे, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी (रिलायन्स एनर्जी) चा इतर व्यवसाय वगळून वीज वितरणाच्या क्षेत्रामध्ये तिचा 'सार्वजनिक प्रधिकरण' या व्याख्येत समावेश होतो व त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी वीज वितरणाच्या कार्यक्षेत्रापुरती लागू होतात.

१२.	तसेही, इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ प्रमाणे वीज वितरण हे वीज ग्राहकांशी थेट संबधित असल्यामुळे व ती सार्वजनिक सेवा असल्यामुळे Maharashtra Electricity Regulatory Constitution (Consumer Grievances Registered Forum and Electricity Amusement) Regulation चे माध्यमातून वीज ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्याचे विनियम करण्यात आलेले आहेत व त्याचे कारण ही वीज ग्राहकांचे हितसंबध सुरक्षित राखण्याचा उद्देश दिसून येतो. यावरुन वीज वितरण ही सार्वजनिक सेवा क्षेत्रात येत असल्यामुळे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या वीज विरतणाच्या हक्काच्या अनुज्ञप्ती संदर्भात वीज वितरणच्या कार्यक्षेत्रामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात.

१३.	तक्रारदार यांनी मात्र जी माहिती त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली आहे, त्या माहितीचा विचार केल्यास सर्वसाधारणपणे वीज देयक खाते क्रमांकासंदर्भात माहिती मागण्यापेक्षा ती तक्रार दिसून येते व त्या संदर्भामध्ये 'वीज लोकपाल' यांचेकडे तक्रार करुन त्यांना तक्रारीचे निवारण करुन घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) व (ञ) प्रमाणे 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केली आहे व त्या व्याख्येप्रमाणे माहिती ही 'सार्वजनिक प्रधिकरणात' साहित्याच्या स्वरुपात म्हणजेच कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके इ. स्वरुपात उपलब्ध असल्यामुळे दस्तऐवजांची किंवा कागदपत्रांची तपासणी करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असे आहे. या दोन्हीही व्याख्येत तक्रारीचे निवारण करण्याची तरतूद नाही किंवा तसे अधिकार राज्य माहिती आयोगाकडे दिलेले नाहीत.

१५.	असे असले तरी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या वीज वितरणाच्या हक्काच्या मर्यादेपर्यंत 'सार्वजनिक प्रधिकरण' व्याख्येत समावेश होत असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात असा निष्कर्ष येत असल्याने या कंपनीने अनुज्ञप्तीच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिनियमाचे कलम ५(१) व १९ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करुन ती सर्वसाधारण नारिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

४. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीला संसदेच्या कायद्यान्वये महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या वीज नियामक आयोगाने वीज वितरणाचे हक्क अनुज्ञप्तीने देण्यात आलेले असल्याने त्या विज वितरणाचे कार्यक्षेत्रासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१) प्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी व कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

५. तक्रारदार यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

६. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

दिनांकः / /२०११
मुंबई.

| | | |
|---|---|---|
| श्री. विलास पाटील<br>राज्य मुख्य<br>माहिती आयुक्त | श्री. भास्कर पाटील<br>राज्य माहिती<br>आयुक्त, अमरावती | श्री. मा. ही. शहा<br>राज्य माहिती<br>आयुक्त, नाशिक |